2 7 NOV 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# युवा संशोधकांकडून देशाला मोठ्या अपेक्षा

## डॉ. डी. पी. अमळनेरकरः पदार्थविज्ञान विभागात राष्ट्रीय परिषद

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : 'युवा संशोधकांकडून देशाला मोठ्या अपेक्षा आहेत,' असे प्रतिपादन पुणे येथील सीएमइटीचे माजी संचालक डॉ. डी. पी. अमळनेरकर यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागात आयोजित 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन २०२३ ' विषयावरील परिषदेच्या उद् घाटन प्रसंगी ते बोलत होते.




कोल्हापूर : स्मरणिकेचे अनावरण करताना डावीकडून परिषदेचे सचिव डॉ. आर. एस. व्हटकर, विभागप्रमुख प्रा. डॉ. के. वाय राजपुरे, डॉ. डी. पी. अमळनेरकर, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एस. एस. पाटील.

यावेळी डॉ. अमळनेरकर यांनी मागील शतकापासूनचे संशोधन व बदललेला प्राधान्यक्रम यावर भाष्य केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी संशोधन व समाज यांचा संबंध जोडताना आवश्यक असणाऱ्या शाश्वत विकासासाठी काम करण्याचे संशोधकांना आवाहन केले. त्यानंतर राणी चन्नमा विद्यापीठातील प्रा. मंजना, डॉ. मुहम्मद मुस्तहफा यांनी पदार्थ विज्ञानातील विविध विषयांवर मार्गदर्शन केले. दुपारनंतरच्या सत्रात सहभागी संशोधक विद्यार्थ्यांनी त्यांचे संशोधन कार्य सादर केले. परिषदेचे सचिव डॉ. आर. एस. व्हटकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2023
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज संविधान दिनानिमित्त संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

# शिवाजी विद्यापीठात प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन



कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठात आज संविधान दिन आणि शहीद दिन या निमित्ताने भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये आज सकाळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

'२६/११' च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहिदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. डॉ. अमोल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. शिवराज थोरात, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. शरद बनसोडे, उदय शिंदे, सुरेश मोरे, राजश्री चिखलवाळे, योगेश पाटोळे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

2 7 NOV 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात पदार्थ विज्ञान राष्ट्रीय परिषद उत्साहात

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठातील पदार्थ विज्ञान विभागामध्ये 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन २०२३' या विषयावर राष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. परिषदेचे उद्घाटन सीएमईटी पुण्याचे माजी संचालक डॉ. डी. पी. अमळनेरकर होते.

डॉ. अमळनेरकर यांनी युवा संशोधकांकडून देशाला असलेल्या अपेक्षांविषयी मार्गदर्शन केले. विद्यापीठाचे प्र. कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांनी आवश्यक असणाऱ्या शाश्वत विकासासाठी काम करण्याचे संशोधकांना आवाहन केले. त्यानंतरच्या सत्रामध्ये डॉ. अमळनेरकर, प्रा. मंजना, डॉ. मुहम्मद मुस्तफा यांनी पदार्थ विज्ञानातील विविध विषयांवर मार्गदर्शन केले. परिषदेस २५० हून अधिक देशातील विविध राज्यांतील संशोधक आणि प्राध्यापकांनी राष्ट्रीय परिषेदमध्ये सहभाग घेतला. परिषदेचे सचिव डॉ. आर. एस. व्हटकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. कार्यक्रमास प्रा. के. वाय राजपुरे, परिषदेचे संयोजक डॉ. एन. एल तरवाळ, डॉ. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2023

तरुण भारत

# विद्यापीठात संविधान दिन, शहीद दिन साजरा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविकात सामूहिक वाचन केले.

याप्रसंगी, '२६/११' च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहीदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते अभिवादन केले. डॉ. अमोल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकाचे वाचन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. शिवराज थोरात, डॉ. प्रकाश गायकवाड, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. कैलास सोनवणे, योगेश पाटोळे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संविधान दिनानिमित्त संविधानाच्या प्रास्ताविकेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात संविधान दिन, शहीद दिन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रविवारी संविधान दिन आणि शहीद दिनानिमित्त भारतीय संविधानकर्ते आणि वीर शहीद जवान यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात येऊन प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.

याप्रसंगी २६/११च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहिदांच्या स्मृतिप्रतिमांनाही कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांनी पुष्प वाहून अभिवादन केले. डॉ. अमोल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. शिवराज थोरात, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. शरद बनसोडे, उदय शिंदे, सुरेश मोरे, राजश्री चिखलवाळे, योगेश पाटोळे उपस्थित होते

जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापू
2 7 NOV 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात संविधान, शहीद दिन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात संविधान दिन व शहीद दिनाच्या निमित्ताने भारतीय संविधानकर्ते व वीर शहीद जवान यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संविधानाची प्रास्ताविका, संविधानाची मूळ प्रत यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी २६/११ मुंबईवरील दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या वीरांसह अन्य शहिदांना अभिवादन करण्यात आले. डॉ. अमोल कुलकर्णी यांनी प्रास्ताविकेचे वाचन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. प्रकाश कांबळे, डॉ. शिवलिंगप्पा सपली, डॉ. सचिन पाटील, डॉ. युवराज जाधव, डॉ. शिवराज थोरात, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. शरद बनसोडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 NOV 2023
पुढारी

# पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाला विद्यार्थ्यांची भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनास डॉ. तानाजीराव चोरगे कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षक, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांतर्गत अभ्यास भेट दिली.

भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी प्रिंट मीडिया व इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल मीडियाचे काम कसे चालते, यासाठी कोणत्या स्वरूपाचा अभ्यास करावा लागतो, याची माहिती जाणून घेतली.

मास कम्युनिकेशन अभ्यासक्रम व प्रात्याक्षिकांची माहिती करून घेतली. पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम, सर्टिफिकेट कोर्स इन डॉक्युमेंट्री फोटोग्राफी, सर्टिफिकेट कोर्स इन शॉर्टफिल्म मेकिंग अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

अध्यासनातील अद्ययावत स्टुडिओला विद्यार्थ्यांनी भेट दिली. विभागातील डिजिटल माध्यम, विविध उपकरणांची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. यावेळी डॉ. तानाजीराव चोरगे वाणिज्य कनिष्ठ विद्यालयाचे प्रा. प्रकाश माळी, प्रा. धनश्री येजरे, प्रा. मधुरा घाटगे, प्रा. प्रवीण सूर्यवंशी आदी उपस्थित होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. प्रसाद ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीबद्दल माहिती दिली. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन भेटीप्रसंगी डॉ. तानाजीराव चोरगे वाणिज्य कनिष्ठ विद्यालयाचे शिक्षक, विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)